प्रकरण : ५

साधकाचा मार्ग : मोक्षमार्ग

[१]आपण जी सात तत्वे पाहिली त्यांचा सम्यक् अर्थ जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. पुष्कळ वेळेला ''अक्षराचा समूह'' म्हणजेच ग्रंथ, आगम असा अर्थ आम्ही मनी-मानसी जाणतो. आगमांना जरी शब्दांच्या मर्यादेतच राहावे लागले तरी जीवन त्याहून अधिक खोल व अधिक व्यापक आहे. जीवनांतील प्रश्नही कालाच्या प्रवाहात अनेक रूपे घेऊन दत्त म्हणून उभे असतात. म्हणून तत्वांचा सम्यक्अर्थ जाणून घेण्याची विनंती आचार्यांनी केली आहे. तत्वांचा अर्थ जाणताना आचार्य लिखित आगमांची वाट धुंडाळत जायला सांगितले आहे. युक्ती व तर्कयांनाही वाट पुसली पाहिजे. श्रेष्ठ गुरूचा उपदेश मनी नीट धरला पाहिजे आणि सर्वात शेवटी व महत्त्वाचे म्हणजे स्व-संवेदनातून फुललेली अनभुवाची सुंदर पुष्पेच या मार्गात अधिक सुवासिक ठरणार आहेत.

---

१. समयसार - ५

अर्हताची प्रवचने सामान्यत: वचन-गोचर असली तरीही वचनाला-अगोचर (न आकलन होणारे) असेही अनेक विशेष धर्म आत्म्यात आहेत. साधकाने त्या गुणधर्माचे अस्तित्व प्रथम जरी श्रध्देने धारण केलेले असले तरी त्यांचा अनुभव प्रत्यक्षात घेणे शक्य आहे, असा विचार मनात धरला पाहिजे. भगवंताच्या प्रवचन रूपी समुद्रात वस्तूच्या अनेक विरोधा-विरोधी गुणधर्माचे सापेक्ष रूपाने विवेचन केलेले आहे. त्या आगमातील शब्द-ब्रह्य मुद्दामच 'स्यात्' पदाने (कथंचित, सापेक्षतेने) विभूषित आहे. अन्यथा त्या शास्त्र समुद्रात पोहतांना विमूढ होण्याची पाळी येते.

अनादी काळापासून आम्ही चारही गतीतून सुख-दु:खाचा, जन्म-मरणाचा आस्वाद घेत हिंडत आहोत. या असंख्य वर्षाच्या काळात असे काय आम्ही हरविले आहे की, ज्यामुळे आत्मा-परमात्मा यांची गाठ पडत नाही ? आत्म्याचे रूपांतर परमहंस परमात्म्यात कां होत नाही ? संसाराचे दुष्टचक्रआम्ही कां तोडू शकलो नाही ? याचे उत्तरच जणुं परम कारूण्यमूर्ती भगवान् महावीरांनी आपल्या उपदेशामृताच्या सिंचनाने दिले आहे. भगवंताचा मार्ग हा मोक्षाचा मार्ग आहे. तो मार्ग बाहेर नाही. तो अंतरात्म्यातच आहे. त्यामार्गाला रत्नत्रय मार्ग म्हणतात.

रत्नत्रय मार्ग - [१/२]

"सम्यक्दर्शन, सम्यक्ज्ञान व सम्यक्चरित्र यांची एकता म्हणजेच मोक्षमार्ग होय." यांना रत्नत्रय अशी संज्ञा आचार्यांनी दिली आहे. त्यातील सम्यक्दर्शनाचे स्वरूप अगोदर पाहूं या.

(१) सम्यक्- दर्शन - जीवात्म्याच्या संदर्भात अजीव, आश्रव, बंध, संवर, निर्जरा आणि मोक्ष यावर सम्यक्श्रध्दान असे म्हणजे सम्यकदर्शन होय. 'तत्वार्थ

---

१. सम्यक्दर्शन ज्ञान चरित्राणि मोक्षमार्ग: । तत्वार्थ १।१

दर्शनज्ञान चारित्रमयात्मा तत्वमात्मन: । अमृतचंद्-समय-टीका २३९

२. दर्शनज्ञान चरित्रैस्त्रिभि: परिणतत्वत: ।

एकोऽपि त्रिस्वभावत्वात् व्यवहारेण मेचक: । अमृतचंद्र-समयसार टीका

श्रध्दानं सम्यकदर्शनम्, असे लहानसे सूत्र आचार्य उमास्वामींनी तत्वार्थ सूत्रामध्ये सांगून जीवनाचा उर्ध्वगामी विचारच बोलून दाखविला आहे. जीवन विकासाची पहिली प्रक्रिया श्रध्दा होय. नव्हे जीवन ज्ञानमय असल्याने तिचे मातृरूप श्रध्दा आहे - आणि पितृरूप चारित्र्य होय. तत्वार्थतील 'तत्व' शब्दाने पदार्थांना जाणून घेण्याची भाव प्रवृत्ती आणि 'अर्थ' शब्दाने प्रत्यक्ष पदार्थ असा घ्यावा. कारण रयणत्तयं ण वट्टई, अप्पाणं मुयत्तु अण्ण दवियम्मि रत्नत्रय म्हणजे चिद्घन आत्माच होय. आत्मा किंव्रा चेतना म्हणजे रत्नत्रय होत. चिद्भाव हे कर्म, चिदेश हा कर्ता आणि चेतना ही क्रिया. दर्शन, ज्ञान, चरित्र असे त्रिविधरूप जरी सांगितले असले तरी ती एका आत्म्याचीच रूपे होत. त्या आत्म्याला आज जे संसारी रूप प्राप्त झाले आहे, ते दूर करून त्याच्या मूळच्या शुध्द स्वरपाप्रत त्याला पोचविणे हाच भगवंताच्या मार्गाचा शुध्द हेतु होय. त्या हेतुसाठी मार्ग चोखाळताना सम्यकदर्शनाची मंगलमय पहाट जीवनात उगवली पाहिजे.

सम्यकदर्शनाची थोरवी अशी की परम-सौख्याच्या, अनंत ज्ञानाच्या, अनंत सुखाच्या सहस्त्र धारा सम्यक् दर्शनाने प्रवाहित होतात. त्याचे स्पष्ट स्वरूप जाणून घेतल्याशिवाय जैन धर्माचे मांगल्य कळून येणार नाही. कारण आतापर्यंत जे जे सिध्द परमेष्ठी झाले, जे जे महान आचार्य झाले ते ते सम्यकदर्शनाच्या प्राप्तीनेच झाले. ती पहिली पायरी होय. ती पायरी स्वीकारली नाही तर

सम्यक्ज्ञान व सम्यक्चारित्र प्रगट होत नाहीत. अनेक दर्शन शास्त्रात सम्यक्दर्शनाच्या ज्या व्याख्या दिसतात. त्या अशा -

१) खरा देव, खरा गुरू व खरे शास्त्र यांवर दृढ श्रध्दा असणे म्हणजे सम्यकदर्शन.

२) स्व-पर यांचे समीचीन ज्ञान म्हणजे सम्यकदर्शन होय.

३) आत्मश्रध्दा म्हणजे सम्यक्दर्शन.

या तीन्ही व्याख्या एकाच अर्थाच्या आहेत. कारण त्या सर्वांचा अभिप्राय एकच आहे. महापंडित श्री. टोडरमलजी मोक्षमार्ग प्रकाशात म्हणतात - आत्मा हा 'स्व' आणि त्याला सोडून जे जे आहेत ते 'पर'. 'स्व' काय आहे हे जाणायला देखील 'पर' जाणून घेतले पाहिजे, म्हणजे निर्णय लवकर होतो. ती एक पध्दती आहे. सातही तत्वांचा अभिप्राय प्रामुख्याने 'स्व' च्याच संदर्भात आहे. 'स्व' म्हणजे आत्मा. तो आता संसारी आहे म्हणून अजीव, आश्रव व बंध यांचे श्रध्दान व ज्ञान हवेच. तसेच संसार रूप जाऊन त्याला सिध्दरूप (स्वत:चे शुध्दरूप) प्राप्त व्हावे म्हणून संवर आणि निर्जरा ही दोन कर्मविरोधक, कर्मविनाशक तत्वे माहिती होणे आवश्यक आहे. आणि मुक्ती (मोक्ष - तत्व) तर त्याचे चिरकांक्षित असे महनीय तत्व होय. कारण तीच त्याची विशुध्द-दशा, परिणती होय.'' [१/२/३/४/५]

अशा रीतीने सात तत्वासंबंधी-तत्वे हीच, दुसरी नाहीत, दुसरी असू शकत नाही अशी प्रगाढ श्रध्दा असणे आवश्यक आहे. कारण तसे न मानले किंवा तसे श्रध्दान मनी रूजविले नाही तर स्व-धर्माचा मार्गच अवरुध्द होईल. आजपर्यंत आपणा सर्वाच्या बाबतीत हेच घडत आले आहे. आत्तापर्यंत 'आत्मविनिश्चिती' घडलीच नाही. आत्मा मानीत आलोत. देहाची शुचिता हीच शुचिता मानीत आलोत. देहपूजा हीच खरीपूजा मानीत आलोत. ज्या शास्त्रांनी, ज्या कु-गुरूंनी, ज्या कु-देवांनी संसारीतील परिभ्रमणाचाच मार्ग शिकविला, त्यांनाच खरे शास्त्र, गुरू आणि देव मानीत आलोत. व्यवहाराने खरा देव, खरा गुरू व खरे शास्त्र यांच्याही श्रध्दानाला सम्यक्त्व म्हटले आहे. हे सम्यक्त्व (सम्यग्दर्शन) फारसे कार्यकारी नसले तरी अरिहंत दर्शन, अरिहंत प्रवचन आणि अरिहंताच्या शासनात अप्रमादी होऊन, देव, शास्त्र व गुरू यांच्यावरील प्रगाढ

---

१. मोक्ष महल की प्रथम सीढी ।

याबिन ज्ञान चरित्रा ।। छहढाला ३।१७.

२. रत्नकरंड, श्लोक-४.

३. मोक्षमार्ग प्रकाशक-पान ३२५.

४. पुरूषार्थ सिध्दी उपाय श्लोक २१६. अष्टपाहूड-गाथा २०.

५. मोक्षमार्ग प्रकाशक (मराठी आवृत्ती वि. सं. २०१३) पान ५७१-५८०.

श्रध्दा ही सम्यत्क्त्वाच्या प्राप्तीला कारण आहे. म्हणून सम्यग्दर्शनासाठी खरा देव, शास्त्र व गुरू यांचेवर ही श्रध्दान असावे.

प्रवचनसारांत असे म्हटले आहे की -

." जो जाणदि अरहंतं दव्वत गुणत्त पज्जयत्तेहिं ।

‘‘ सो जाणदि अप्पाणं मोहो खलु जादि तस्स लयं । प्रवचन. ८०.

‘‘ जो द्रव्य, गुण आणि पर्याय रूपांनी अरहंतांना जाणतो तो स्वत:च्या आत्म्यालाही जाणतो. आणि खरोखरच त्याचा मोह देखील लयाला जातो.’’

ज्याप्रमाणे मंदिराचे शिखर दुरून पाहूनही भक्तिभाव उचंबळून येतो त्याप्रमाणे बाह्य साधनांनी अतंरंगातील शुभ भावही उचंबळू येतो. अरिहंताला पाहिले की, वीतरागता कशी असते, उत्कृष्ट ध्यान कसे असते, उत्कृष्ट निरासक्ती कशी असते, उत्कृष्ट भेद-विज्ञान कसे असते हे प्रत्ययास येते. म्हणूनच कुंदकुंदासारखे थोर थोर आचार्य, गौतमादिक महान गणधर अर्हतांचे चरणी विलीन होतात. अर्हताच्या रूपात स्व-रूप पाहाण्याची दिव्यशक्ती त्यांना प्राप्त होते. कारण अर्हत् हाच आमचा आदर्श आहे.

दुसरे, वर जी वेगवेगळी लक्षणे दिलीत, त्या सर्वात एकच गोष्ट ध्यानी घेतली पाहिजे की मिथ्यात्व कर्माचा उपशम किंवा क्षय झाल्याखेरीज सम्यक्त्व प्राप्त होत नाही. आणि स्व-पर विज्ञानाने, खऱ्या देव-शास्त्र-गुरुंच्या श्रध्दानाने, सात तत्वांच्या श्रध्दानाने मिथ्यात्वाचे गडद रंग फिक्के होतात, विरळ होतात. आणि आत्म्यातील सम्यक्त्व शक्ती उदयाला येते.

पुष्कळ वेळा आपण भ्रमात किंवा संदेहात राहतो की आपल्याला सप्त तत्वांचे श्रध्दान् झाले आहे, आपली अर्हतावर, अर्हत प्रणीत शस्त्रावर, खऱ्या साधूवर श्रध्दा आहे. पण ती श्रध्दा खरी

आहे की भ्रम आहे, हे अंतर्मुख होऊन तपासले पाहिजे. कारण- सप्ततत्वावर ज्याची श्रध्दा आहे तो गर्वोध्दत नसतो. अहंकाराची बीजे जळून गेलेली असतात. त्याला मोहामुळे काही चांगले आचरण करता येत नसेल. पण त्याच्या श्रध्दे संबंधाने, सद्-असद् जाणीवे संबंधाने शंका घेता येत नाही. तो विनीत असतो. जे चांगले असेल त्याबद्दल त्याची दृष्टी आदराची असते. विहारात तो सदैव जागृत असतो. त्याच्या पुण्यमय किंवा पापमय क्रियेतही तो जागरूक असतो. म्हणून तो निर्भय असतो. तो भूतकाळावर जगत नाही. किंवा भविष्याकालीन आशेवरही जगत नाही तो सदैव वर्तमानांत जागरूक असतो. तो प्रत्येक क्षणी जागरूक व आत्मस्थित असतो.

सम्यक्‍दर्शन होणे म्हणजे जन्म-मरण-विनाशक नवा जन्म होय. सम्यग्दर्शनाचे महात्म्य सांगताना अशी उपमा दिली जाते की, भयंकर अशा महासर्पाचे विष जसे गारूडी उतरवितो, तसे अनादी जन्मातील क्रोधादी कषायांचे विष, अज्ञानाचे विष आणि विशेषत: अंध-श्रध्दानाचे महाविष सम्यग्दर्शनाने उतरते. योग्य नंबरचा चष्मा धारण करताच वस्तू स्पष्टपणे दिसतात, किंवा दुर्बिणीच्या मदतीने आकाशातील अनेक अदृश्य ग्रह जसे स्पष्ट दिसतात, तसेच सम्यक्‍दर्शनाने आत्म्याच्या शुध्द स्वरूपाचे स्पष्ट दर्शन होते.

आत्मप्राप्तीचे बीज म्हणजे सम्यग्दर्शन होय. बी नसेल तर वृक्ष असणार नाही आणि मग फल प्राप्ती तर दूरच ! सम्यग्दर्शन म्हणजे आत्मबोधीच्या वृक्षाचे ‘बी’ होय. खरे तर आत्म्याच्या ज्ञानमयतेचा मुख्य आधार म्हणजे सम्यक् दर्शन. परंतु बी दिसत नाही. ते वृक्षातच सामावून जाते. तसेच सम्यक्त्व हे ज्ञानागुणातच सामावून जाते.

सम्यग्दर्शन-व्यवहारत: आणि निश्चयत :

जैन ग्रंथातून व्यवहार आणि निश्चय अशा दोन्ही दृष्टीतून सम्यक् दर्शनाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. व्यवहार मार्गाला ‘असद्‌भूत’ (मिथ्या) म्हटले असले तरी निश्चयमार्ग जाणून घेण्यासाठी तो उपयोगी आहे. दोन्ही नयात विरोधी नाही. जसे-एखाद्या मुलाला आपण चित्र दाखवून हत्ती, सिंह, धोडा याची ओळख करून देतो. पण चित्रातील ते प्राणी खरे नव्हेत. परंतु शिक्षणासाठी, ज्ञानासाठी ती चित्रे उपयोगी खासच आहेत. साध्य आहे निश्चयमार्ग आणि व्यवहारमार्ग हा चित्रासारखा साधनभूत. म्हणून व्यवहारमार्ग म्हणजे धर्म असे समजणे अज्ञानाचे ठरणार आहे. एके ठिकाणी आचार्य अमृतचंद्र म्हणतात -

।। जइ जिणमयं पवज्जह ता मा ववहारणिज्छए मुयह ।

एक्केण विणा छिज्जई तित्थं, अण्णेण उण तच्चं ।

जर जैनधर्माचे मर्म जाणून ध्यावयाचे असेल तर व्यवहार व निश्चय हे दोन्ही मार्ग जाणावेत. कारण व्यवहार सोडला तर भगवंताचे तीर्थ (व्यवहारमार्ग) नष्ट होईल. निश्चयनय सोडला तर तत्वव्यवस्था खलास होईल. म्हणून निश्चय आणि व्यवहार हे जाणून घेण्याचे कार्य साधकाचे आहे. त्या दोघांत विरोध समजून जे भांडतील ते साधक होणार नाहीत.

जोपर्यंत सम्यग्दर्शन झालेले नाही किंवा स्व-पर विवेकाचा अनुभव आला नाही तोपर्यंत व्यवहाराचा आश्रय करावाच लागतो. खरी फुले जोवर पहायला मिळत नाहीत, तोवर त्यांची चित्रेच पाहून समाधान मानून घ्यावे लागते. दुधाची तहान ताकावर भागवावी लागते. मात्र त्यावेळी दुधाची आकांक्षा, जिज्ञासा मनामध्ये असावी लागते. तसेच भगवंतांचा नियचयमार्ग हाच अंती खरा व मोक्ष मिळवून देणारा आहे, अशी नेणीव नसेल तर व्यवहारमार्गही कार्यकारी ठरत नाही. असा व्यवहार त्याज्य होय. सुवर्णकार शंभर टक्के शुध्द सोने मिळविण्याचा प्रयत्न करतो. परंतु तितके शुध्द सोने न मिळाले तरी ८० टक्के शुध्द सोनेही तो घेतो, तसेच साधकानेही लक्षात घ्यावे की, आपला स्वत:चा आत्मा परद्रव्यापेक्षा अगदी वेगळा आहे. तो आत्मा नित्य, शुध्द, ज्ञानमय, अनन्य, संयोग-वियोग रहित आहे. अशी शुध्द अनुभूती म्हणजेही आत्माच होय. अनादी काळापासून कर्ममलांनी तो लिप्त राहात आला तरी त्याचे मूळ स्वरूप अत्यंत अलिप्त व अबध्दच होय. अग्नीला जसे वस्त्र झाकू शकत नाही, अशी प्रचीती निर्माण होऊन ती दृढ श्रध्देत परिवर्तित झाली पाहिजे. मिथ्यात्वाच्या तीव्रतेमुळे जरी सम्यक्दर्शन होत नसेल तरी ते न झाल्याबद्दलचा खेद उरी निर्माण झाला पाहिजे. आत्मदर्शनाच्या अपात्रतेचा अनुभव हाही ग्राहयच होय. त्याच अनुभवपीडेतून सम्यक्त्व प्राप्तीचा पुरूषार्थ घडणारा आहे. आचार्य अमृतचंद्रांनी आत्मदर्शन न घडण्याची पांच कारणे प्रस्तुत केलेली आहेत-

१) अनादी काळापासून कर्माचा संबंध आल्याने आत्मा कर्म - बध्द आहे, असा समज होतो.

२) कर्माच्या निमित्ताने तो स्वत: ला स्त्री-पुरुष, मनुष्य, तिर्यंच, देव इ. रूपाने जाणतो.

३) आत्म्यातील अनंत सामर्थ्याचे अल्पांशाने दर्शन घडत असल्याने परिपूर्णरीतीने आत्म-शक्तीचा प्रत्यय येत नाही.

४) आत्म्यातील चिद्‌घन महाशक्तीची विविध रूपे पाहिल्याने एकाकार आत्म्यासंबंधी अनेकतेचा भास होतो. त्या आत्म्याच्या सामान्य महासत्तेची किरणे त्याच्या हृदयात प्रवेशत नाहीत.

५) कर्माच्या बाह्य निमित्ताने होणारी मोह, द्वेषमय आत्म्याची रूपेच त्याला दिसतात.

यासाठी शुध्द द्रव्याच्या दृष्टीने आत्मा परद्रव्यापासून सर्वथा भिन्न, व सर्व पर्यायीत (परिवर्तनांत) एकाकार, हानीवृध्दी रहित, सर्व वैशिष्ट्यांनी रहित, नैमित्तिक भावांनी रहित, आणि केवळ ज्ञानमय आहे, असे जो श्रध्दान करतो, जापणतो तोच खरा सम्यक्त्वी पुरूष होय.

[१]" एष ज्ञान घनो नित्यमात्मा सिध्दिमभीप्सभि : ।

साध्यसाधकभावेन द्विधैक: समुपास्यताम् ।" समयसार-कलश-१५.

आत्मा हा ज्ञानधनच नित्य आहे. म्हणून मोक्षार्थी पुरूषाने हे जाणावे की त्या आत्म्याचे शुध्दरूप पूर्णरूप हे साध्य आहे. आणि अपूर्णरूप हे साधक आहे.

---

१. समयसार - अमृतचंद्राची टीका- १२, १४.

मडके जर साध्य असेल तर कच्चा माल म्हणजे माती हे साधक होय. तसेच ज्याने आत्म्याच्या गुणावर श्रध्दान केलेले असेल व ते श्रध्दान जर अव्यभिचारी असेल तर तो हे स्पष्टपणे जाणील, अनुभवील की, आत्मा ज्ञानमय असल्याने, चेतनेच्या दिव्य रसाने परिपूर्ण असल्याने जड पदार्थाचा अनुभव, त्यांच्याशी एकत्व प्रसंग येणे शक्य नाही. परंतु अनादी काळापासून मिथ्यात्व, अज्ञान आणि मोह यांच्यामुळे सतत परपदार्थाशी संशेग-संबंध येत राहिला. तो संबंधच खरा वाटू लागला व त्या संबंधाच्या इष्ट वियोगात व अनिष्ट संयोगातच आम्ही स्वत:ला सुखी किंवा दु:खी मानू लागलो. ही मिथ्यात्वाची वाळवी दूर करावयाची असेल तर आत्म्यासहित सप्त तत्वावर दृढ श्रध्दान हवे. जिथे श्रध्दा नाही तिथे जीवनच नाही.

आजचे भौतिक जीवन व सम्यक्दर्शन

भ. महावीरांनी ज्या आत्म - श्रध्देचा उल्लेख केला ती भगवती श्रध्दा - देवी सर्वथा उपासनीय आहे. आजच्या विज्ञान युगात आणि येणाऱ्या भविष्य काळातही ज्याची जीवनावर श्रध्दा नसेल, आत्म्यावर श्रध्दा नसेल तो समाज किंवा ते राष्ट्र नष्टच होईल. समाजाचे भौतिक जीवनही स्वाधिष्ठितच हवे. सुखाची साधने म्हणून ज्यांचा आपण स्वीकार करतो त्या साधनांच्या मर्यादा आपण स्वीकारल्या पाहिजेत. तसेच जी सुखे म्हणून गणली जातात, ती विनाशी, काल्पनिक, देशकाल- परत्वे बदलणारी व आधिक्याने दु:खात बदलणारी आहेत. म्हणून श्रध्दा चिरकाल अपेक्षित असे तत्व आहे. या श्रध्देला श्रेष्ठतम जीवनाशी जेव्हा जोडले जाते तेव्हा व्यक्तीचा, समाजाचा व राष्ट्राचा उध्दार होतो. जेव्हा ही श्रध्दा काम भोगातच गुंतून राहते, तेव्हा ती पतित होते. म्हणून लौकिक अर्थानेही जीवन समृध्द, संपन्न आणि उन्नत करायचे असेल तर मानवांच्या श्रध्दा उंचावल्या पाहिजेत. असेही घडणे अगदी शक्य आहे की राष्ट्रे संपत्ती, वैभव व सुखसामग्रींच्या अत्युच्य शिखरावर असताना नारकी जीवाप्रमाण् परस्परावर प्राणघातक हल्ले करतील. संसार, शरीर आणि भोग यांच्या उत्कटतेतूनही माणसांचे मन विटते. त्या संपन्नतेत नश्वरतेचा, जडतेचा अनुभव येऊ लागतो. क्षत्रियाला जसे अहिंसेचे तत्व पटते, तसेच उपभोगाच्या परम सीमेवर उभ्या व्यक्तीला वैराग्याचे सूत्र पटते. इतिहासात हे अनेकदा घडले आहे. ऐश्वर्यात जन्म घेणाऱ्यांनी उभी हयात वनात, दरी-खोऱ्यांत घालविली आहे. संपन्नतेच्या त्यागासाठी लागणारी आत्मिक संपन्नता ही आगळीच गोष्ट आहे.

आधुनिक काळातील मार्क्ससारखे समाजावर व्यापक परिणाम घडविणारे तत्वदर्शक लोकही आजच्या युगाच्या संदर्भात आपला स्वत:चा विचार हा अपूर्ण आहे असे सांगतील. याचे कारण मानवी समाजाच्या समस्यांचा बाह्यविचार हा केवळ एक भाग आहे. मानवाच्या आंतरिक जीवनाचा परिपाक म्हणजे बाह्य जीवन होय. म्हणून आंतरिक जीवन उजळण्याचे कार्यही अत्यंत मोलाचे आहे. ते न झाले तर मानव समाज नारकीय समाज होय. जीवन विषयक चिरकालीन मूल्यांची बदलत्या संदर्भात वारंवार प्रतिष्ठापना होणे अगत्याचे असते. व त्यासाठी तीर्थंकर, गणधर, महर्षी आणि तत्वज्ञ मंडळींची देशाला, समाजाला गरज असतेच. आचार्य उमास्वामी या जन-जागरणाला सूत्रात्मक रीतीने सांगतात -''तत् निसर्गात् अधिगमात् वा'' मानवाच्या मनात

कोंडलेला मिथ्यात्वाचा अंधकार दूर करायचा मार्ग निसर्ग - म्हणजे चेतनेचा स्वभाव तर आहेच, शिवाय अधिगम म्हणजे अध्ययन, स्वाध्याय, सत्संग, गुरूपदेश किंवा अर्हंत प्रवचने ऐकणे हाही एकमार्ग आहे. सम्यक् रीतीने मानवीय समाजाचे शिक्षण घडवून आणून उत्कट सांस्कृतिक जीवानाची निर्मिती होऊ शकेल आणि हा अधिगमाचा मार्गच भ. महावीरांनी स्वीकारुन सतत चाळीस वर्षे आपल्या करूणामयी दिव्यवाणीने मानव-समाजाचे आध्यात्मिक शिक्षण केले. त्या चाळीस वर्षाच्या काळांत अगदी सामान्यांच्या जीवनापासून तो उच्चभ्रूंच्या जीवनापर्यंत त्यांनी आपली वाग्गंगा दुथडी भरुन पोचविली. त्यांच्या वाग्गंगेचे वर्णनही एका कवीच्या काव्यात मोठेच रस युक्त केलेले आहे. तो म्हणतो -

" यदीया वागंगा विविध नयकल्लोल विमला।
बृहत् ज्ञानांबांभि-र्जगति जनतां या स्नपयति।
इदानीमप्येषां बुधजन मरालै : परिचिता।
महावीर स्वामी नयनपथगामी भवतु नः। महावीराष्टक स्त्रोत्र - ६

महावीरांची ही वाणी एखाद्या गंगेप्रमाणे प्रवाहित झालेली होती. तिच्यामध्ये अनेक प्रकारचे व्यवहारनिश्चयादि अनेक नयांचे कल्लोळ (तरंग) उठत होते. ती वाणी स्वतः अत्यंत विमल होती व दुसऱ्यांनाही निर्मळ करीत होती. त्यांच्या त्या वाक्गंगेत सर्व जनता मोठ्या आनंदात नहात होती. आज देखील काही बुध्दिमानांना ती परिचित आहे. अशा वाक्गंगेचे प्रवर्तक भगवान महावीर आम्हाला पथप्रदर्शक होवोत !"

महावीरांचा मार्ग सत्यग्राही लोकांचा आहे. तेथे आग्रह नाही. तेथे दंडसत्ता नाही. तेथे केवळ आवाहन आहे. मानवाच्या सुकृताला आवाहन आहे मानवातील दिव्यत्वाला हाक आहे. ऐहिक जीवन खऱ्या अर्थाने तेव्हाच संपन्न बनते जेव्हा ते आतूनही संपन्न होत असते. म्हणून महावीरांच्या धर्मातील पहिली अट आहे सम्यक् दर्शन ! जीवनाला तुकड्यांच्या स्वरुपांत न स्वीकारता समन्वयात (एकत्व - स्वरुपांत) स्वीकारले पाहिजे. वर्तमान-भूत-भविष्यात्मक असे एकमय जीवनाचे दर्शन घडले पाहिजे. द्रव्याच्या अनंत पर्यायींचा समूह म्हणूनच द्रव्याला स्वीकृती

दिली पाहिजे. कोणतीही वस्तु विज्ञान - निष्ठेने जाणायची तर तिचे घटकमय गुणही जाणून घेतले पाहिजे. तसेच आत्मा - चैतन्य हे जर द्रव्य आहे तर त्याचेही ज्ञान वर्तमान-भूत-भविष्यात्मक असे त्रिविध असले तरी ते वस्तु-दृष्टीतून एकरूप दिसले पाहिजे.

सम्यक्त्व होण्यापूर्वी

सम्यक्त्व होण्यापूर्वी पांच प्रकारच्या लब्धी (प्राप्ती - स्वरुपाची भावविशेष) सांगितल्या आहेत.

१) क्षयोपशम लब्धी -

तत्व विचार करण्याएवढी आत्मिक शुध्दता कमीत कमी त्या चेतनेची झाली पाहिजे. तरच तो सम्यक्त्व प्राप्तीसाठी पात्र ठरतो. म्हणून ज्ञानावर आवरण टाकणाऱ्या कर्मांचा क्षयोपशम होणे आवश्यक आहे.

२) विशुध्दी - लब्धी -

सम्यक्त्व प्राप्त करुन घेण्याइतकी चेतनेची निर्मळ अवस्था प्राप्त होणे.

३) देशना - लब्धी -

सम्यक्त्व प्राप्ती कधी कधी योग्य अशा उपदेशाच्या निमित्ताने होते. भगवंताची प्रवचने, गुरूचा उपदेश, शास्त्राचे वाचन इ. मुळे सम्यक्त्व प्राप्तीची भूमिका तयार होऊ शकते.

४) प्रायोग्य - लब्धी -

सम्यक्त्व प्राप्तीसाठी इंद्रिये, शरीर व मनाची योग्य साथ प्राप्त होणे ही प्रायोग्य लब्धी होय.

५) करण - लब्धी -

करण म्हणजे चेतनेचे परिणाम. चेतनेच्या शुध्दीसाठी आवश्यक अशी भावावस्था प्राप्त होणे ही करण लब्धी होय. सर्व लब्धीत हीच प्रमुख होय. चेतनेच्या रूपातून मंगल रूपात

प्रवेश करण्यासाठी जो पुरूषार्थ घडावयाचा आहे तो याच लब्धीतून होय. या करणाचे अध:करण, अपूर्व करण आणि अनिवृत्तीकरण चार भेद आहेत. पहिल्या चार लब्धी सामान्य आहेत. करण लब्धी ही विशेष स्वरुपाची आहे. ती झाल्यावर सम्यक्त्व प्राप्त होतेच.

---

(१) वर्तमानांत उदयास येणाऱ्या सर्व स्पर्धकांच्या निषेकांचा क्षय आणि भावी काळात उदयास येणाऱ्या देशघाती (किंचित् घात करणाऱ्या) स्पर्धकांचा उपशम होणे म्हणजे क्षयोपक्षम होय. - गोम्मटसार गाथा ६४५

सम्यक्त्वाचे भेद -

तसे पाहिले तर व्यक्तिपरत्वे सम्यक्त्वाचे अनेक भेद होतील. कारण ज्या स्वरूपाचे भाव (करण) त्या स्वरुपाचे सम्यक्दर्शन. आत्म्यातील, चेतनेतील दर्शन गुणाच्या आश्रयानेच सम्यक् दर्शनाचा मागोवा घ्यावा लागतो. काही कर्मग्रंथातून कर्मांच्या अपेक्षेने सम्यक्दर्शनाच्या प्रभेदाचे प्रदीर्घ वर्णन आपणास पाहावयास सापडते. आचार्य नेमिचंद्रानी सांगितलेले काही प्रभेद येथे देण्यांत येत आहेत.

१) क्षयिक सम्यक्त्व -

दर्शन मोहनीय कर्मांच्या क्षीणतेने चेतनेची जी शुध्दता होते ते क्षायिक सम्यकत्व होय. हे सम्यक्त्व प्राप्त झाल्यावर ते कधीच नाश पावत नाही. याचा अर्थ शुध्द परिणाम पुन: अशुध्दाकडे वळत नाहीत. अनंतानुबंधी क्रोध, मान, कपट आणि लोभ हे चार कषाय आणि दर्शन मोहनीय कर्माचे मिथ्यात्व, मिश्र व सम्यक्त्व प्रकृती हे तीन, असे सातही क्षीण झाले की अत्यंत निर्मळ व अविनाशी सम्यक्त्व प्राप्त होते. 'पंचाध्यायीत' सप्तैते दृष्टिमोहनम् असे सूत्रात्मक वर्णन आहे. तेही हेच सुचविते की, दर्शन मोहनीय कर्माच्या सात प्रकृतींचा पूर्णत: क्षय झाल्यावरच अक्षय्य असे सम्यक्दर्शन प्राप्त होते.

हे सम्यक्त्व प्राप्त झाल्यावर त्याच जन्मात किंवा तिसऱ्या, चौथ्या जन्मातच कैवल्य प्राप्त होते. जास्तीत जास्त चौथा जन्म हा सिध्दगती देणारा असतो. हे सम्यक्त्व सहसा केवली भगवंतांच्या चरण कमलांच्या दर्शनाने होते.

२) वेदक सम्यक्त्व -

वर सांगितलेल्या सात विरोधी कारणापैकी शेवटचे सम्यक्त्व प्रकृती, हे विरोधी कारण ज्या वेळी उपस्थित होते त्यावेळी सम्यक्त्व असून देखील तत्वासंबंधी, त्याच्या निर्णयासंबंधी चलबिचलता निर्माण होते. सम्यक्त्वाच्या शुध्दतेत गढूळपणा निर्माण होतो. अशा प्रकारच्या सम्यक्त्वाला वेदक सम्यक्त्व म्हणतात.

३) उपशम सम्यक्त्व -

वर निर्दिष्ट केलेल्या सात सम्यक्त्व विरोधी कर्मप्रवृत्तींचा उपशम होऊन जेव्हा तत्वासंबंधी श्रध्दा निर्माण होते तेव्हा हे सम्यक्त्व होते. पाण्याती ल गाळ खाली बसल्याने पाणी शुध्द दिसते. पण गाळ असेपर्यंत पाणी गढूळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४) व्यवहार सम्यक्त्व -

खरा देव, खरा गुरु व खरे शास्त्र यावर दृढ श्रध्दा ठेवणाऱ्या कोणत्याही जीवाला हे सम्यक्त्व होते. अज्ञानामुळे सात तत्वांचा विचार मनात धारण झाला नसेल, परंतु अर्हत हेच माझे उपास्य दैवत; निर्ग्रंथ व कषायांच्या पासून दूर असलेले साधू हेच माझे खरे गुरू व अर्हताच्या वाणीला स्मरून सांगितलेले, मोक्ष मार्गाचा उपदेश देणारे शास्त्र आहे, अशी दृढ श्रध्दा ज्याच्या मनात आहे तो देखील सम्यक्त्वी आहे.

[१]५) निश्चय सम्यक्त्व -

हे सम्यक्त्व प्राप्त करणारा नैष्ठिक श्रावक सप्त तत्वावर तर श्रध्दा ठेवतोच, त्या बरोबर आत्म्यासंबंधी अशी दृढ श्रध्दा त्याच्या मनात असते की, आत्मा जरी आज अशुध्द, बध्द, कर्मस्पर्शित आणि पर्याय रूपाने दिसत असला तरी तो नित्य शुध्द, विज्ञानघन, कर्ममलरहित, अनादि निधन, नित्य निरंजन स्वरूपाचा आहे. तेच माझ्या आत्म्याचे शुध्द स्वरुप होय. आत्म्याच्या ज्ञानघन स्वरुपाचे व अमरत्वाचे स्पष्ट दर्शन ज्याला होते तो निश्चय सम्यग्दर्शनी जीव जाणावा.

सराग सम्यक्दर्शन आणि वीतराग सम्यक्दर्शन असेहि भेद केलेले दिसून येतात. वीतराग अवस्था प्राप्त होईपर्यंत जे सम्यग्दर्शन राहील ते स-राग सम्यग्दर्शन म्हणविले जाते. कैवल्य प्राप्त झाल्यावर जो वीतरागपणा प्राप्त होतो व त्यावेळी जे सम्यग्दर्शन असते ते वीतराग सम्यग्दर्शन होय. याशिवाय निसर्गज

---

१. गोम्मटसार गाथा ६४६, ६४७

सम्यक्त्व आणि अधिगमज सम्यक्त्व असेही दोन भेद आढळतात. स्वयमेव आत्मशुध्दीने जे प्राप्त होते ते निसर्गज आणि गुरु किंवा शास्त्र यांचे निमित्ताने जे प्राप्त होते ते अधिगमज होय.

सम्यग्दर्शनाची आठ अंगे : [१/२]

सम्यदर्शनाचा सूर्य आत्माक्षितीजावर उगवू लागल्याबरोबरच आत्मोत्थानाची पहाट होते. दिव्य आत्मयाचा साक्षात्कार ही अशी अलौकिक घटना असते की सारे जीवन बदलून जाते. यशस्तिलक या ग्रंथात सोमदेव आचार्यांनी सुन्दर उपमा देऊन त्याचे वर्णन केले आहे ते म्हणतात -

"ज्याप्रमाणे घराला पाया, अलौकिक सौंदर्य प्राप्त व्हायला भाग्य, भौतिक सुखांच्या उपभोगासाठी निरोगी शरीर, यशासाठी राजसत्ता, पवित्रतेसाठी संस्कृति आणि राजकारणासाठी राजनीती आवश्यक आहे त्याप्रमाणे मोक्षासाठी सम्यग्दर्शन आवश्यक आहे." [२]

अशा सम्यग्दर्शनाची आठ अंगे आहेत. १) नि:शंकित २) नि:शांक्षित ३) निर्विचिकित्सा ४) अमूढदृष्टि ५) उपगूहन (उपबृंहण) ६) स्थितिकरण ७) वासल्य ८) प्रभावना.

नि:शंकित - स्वत:चे ज्ञान सीमित असल्याने भगवत्-प्रणित सप्ततत्वावर किंवा आत्म्यावर शंकाविरहित श्रध्दा असणे हे नि:शंकित अंग होय. तत्वामध्ये शंका निर्माण झाल्यावर ती दूर नाही झाली तर मनोवृत्ती दोलायमान होतात. संशय, विमोह, विभ्रम इं. अनेक विकार निर्माण होतात. म्हणून सर्व ज्ञ भगवंताच्या निर्दोष प्रवचनाशी तादाम्य पावणे व त्यासंबंधी शंका न घेणे ही महत्वाची गोष्ट आहे. पण येथे हे लक्षात घ्यावे की हा विचार अंधश्रेध्देला लागू नाही. अंधश्रध्दा ही

जिनधर्माला सर्वथा त्याज्यच होय. इतकेच नव्हे तर श्रध्देचा आभासही त्याज्यच होय. म्हणून अनुप्रेक्षाकारांना केवळ सात तत्वावरच श्रध्दान

---

१. सर्वार्थसिध्दि पान १०. १ सर्वार्थसिध्दी - १.३

(१) यश. पान २४८, चरित्र पाहुड - ७. उत्तराध्ययन - २८, : ३१

ठेवण्याचे न सांगता त्यात नय, प्रमाण व स्याद्वाद यांचाही समावेश केलेला आहे.[१] समंतभद्रानी रत्नकरंडामध्ये केवळ सात तत्वावरील श्रध्देला सम्यक्दर्शन न म्हणता त्यात विशद रीतीने देव, शास्त्र व गुरू यांच्या वरील श्रध्दानालाही जागा करून दिली आहे. ते म्हणतात.

" श्रध्दानं परमार्थांनां, आप्तागम तपोभृताम् ।
त्रिमूढाऽपोढ मष्टांगं, सम्यक्दर्शन मस्मयम् " ।। रत्नकरंड - ४.

परमार्थ म्हणजे आत्मा यावर, तसेच खरा देव, शास्त्र व गुरु यावर लोकमूढता, देवमूढता व पाखंडी मूढता या तीन मूढतांनीहीरहित, आठ अंगांनीसहित, आठ गर्वांनी रहित, व सात भयांनी रहित श्रध्दा ठेवणे म्हणजे सम्यक्दर्शन होय.

२) नि: कांक्षित :

सम्यक्दर्शनी जीव हा जागृत असतो. त्याच्या तृष्णेवर अग्नी संस्कार झाला असतो. त्याला ऐहिक सुखदु:खासंबंधी कसलीही कांक्षा-इच्छा नसते. आशेवर जगण्याची रीत त्याची नसते. जी सुख-दु:खे त्याला भोगावी लागतात त्यासंबंधीही तो उदासीनच असतो.

३) निर्विचिकित्सा :

शरीर हे कर्माच्या उदयाचे फळ आहे हे जाणून त्याला होणाऱ्या रोगराईत देखील तो चित्तवृिती मलीन होऊ देत नाही. तो घाण पदार्थांनी मनांत किळस निर्माण होऊ देत नाही.

४) अमूढदृष्टि :

जे विचार किंवा जे दृष्टिकोण आत्मधर्माशी विसंगत असतील, मोक्षमार्गाकडे प्रवृत्त करणारे नसतील त्या मार्गापासून जो दूर रहातो तो अमूढदृष्टि होय. वस्तूंचे अनंत धर्म आहेत. त्यापैकी एक किंवा अनेक गुणांचाच आग्रह धरणाऱ्या मतांशी सहमत न होता स्याद्वाद पध्दतीने वस्तूचे स्वरूप ग्रहण करणे हे अमूढ दृष्टिपणाचे रक्षण आहे. या अंगामूळे खोटा देव, खोटे गुरु व खोटे शास्त्र व खोटा मार्ग यांचा स्पष्टपणे निषेध केला जातो. खोटा मार्ग व त्या मार्गाने जाणाऱ्या अनुयायांचा अनुनय, विनय, संमती, स्तुती इ. गोष्टींचाही त्याग करणे आवश्यक असते. सम्यक्त्वाचे हे अंग विशेष महत्वाचे आहे.

५) उपगूहन :

भगवंताच्या उत्कृष्ट मार्गाने जाणाऱ्या श्रावकांच्या किंवा मुनींच्या आचारात काही शैथिल्य निर्माण झाले तर, त्यांनी काही अनुचित आचरण केले तर त्या दोषांची वाच्यता न करता ते दोष त्यांचेकंडून घडणार नाही, असा विधायक प्रयत्न करणे हे उपगूहन अंग होय. याचा अर्थ असा नव्हे की मुनी आणि श्रावकांना अनुचित मार्गाने जाऊ द्यायचे. उलट अर्हत- मार्ग शुध्द राहावा यासाठी दोषपूर्ण आचरणाचे विवेकाने निराकरण करावे. त्याला दुसरे नाव उपबृंहण असेही आहे. मुनींची व श्रावकांची धर्मनिष्ठा व धर्माचरण अधिकात अधिक चांगली होईल असे वातावरण तयार करणे, हेही याच अंगात मोडते. सांस्कृतिक दृष्टीने समाजाचा दर्जा वाढावा यासाठीही सम्यग्दर्शनी माणसाने प्रयत्न करावा, अशी भगवंतांच आज्ञा आहे.

६) स्थितीकरण -

भगवंताच्या मार्गापासून जे दूर गेले असतील किंवा जात असतील त्यांना अर्हत् मार्गात स्थिर करणे हे स्थितीकरण अंग होय. निश्चय दृष्टीने आत्म-मार्गापासून जर कुणी विन्मुख होत असेल तर त्याला पुन:आत्ममार्गात स्थिर करणे हे स्थितीकरण अंग होय.

७) वात्सल्य अंग -

गाईचे आपल्या वासरावर जसे प्रेम असते तसे भगवंतांच्या मार्गाने जे जात आहेत त्यांच्यावर निरपेक्ष प्रेम करणे हे या अंगाचे वैशिष्ट्य होय. वात्सल्य हे धर्म व संस्कृतीसंवधर्नाचे प्रमुख अंग होय. या अंगाकडे दुर्लक्ष झाल्यास मानव मानवाचा शत्रू बनेल. कषायांच्या उपशमाशिवाय वत्सलता घडू शकत नाही.

८) प्रभावना - अंग -[१]

अर्हत् प्रणीत तत्वे ही अखिल जीवसृष्टीला सर्वोत्तम सुखाप्रत नेणारी आहेत. संसारातील दु:खांचा समूळ नाश करून अनाश्रवी सुखाप्रत नेणारी ती महामंगल तत्वे आहेत. म्हणून ज्यांचे ज्यांचे जैन तत्वावर प्रेम आहे त्यांनी अर्हत प्ररूपित तत्वांचा सर्व मार्गांनी मन, वचन व शरीर यांच्या मदतीने प्रचार करावा. मानवा-मानवात प्रेम, सहानुभूती, दया-भाव, कारूण्य, समंजसपणा निर्माण केला तर हीच कर्मभूमी सुखद होईल यात प्रभूंना शंका नाही. म्हणून धर्म प्रभावनेचे महत्त्वाचे अंग त्यांनी सम्यक्दर्शनात समाविष्ट कलेले आहे. धर्मसूर्याचा प्रकाश मानवाच्या अंधाऱ्या मनात नेवून पोचविणे हे कर्तृत्वदर्शक अंग धार्मिकासाठी सांगितले आहे. ज्याला ज्याला आत्मोत्कर्षाच्या मार्गाने जावयाचे आहे त्याला सद्धर्माच्या प्रसाराचे बंधन आहे, हे कुणीही विसरू नये. नदी जशी वाहत गेली पाहिजे, वृक्ष जसे फळाफुलांनी बहरले पाहिजेत तसा धार्मिक माणूस सद्धर्माच्या प्रसारासाठी आतून उत्कंठित झाला पाहिजे. यासाठीच ‘‘ न धर्मो धार्मिकैर्विना ।’’

असे अल्पसूत्रातून मानवाच्या प्रगत संस्कृतीचे दिव्य सूत्र सांगितले आहे.

सम्यग्दर्शनाची आठही अंगे सामाजिक स्वरूपाची आहेत. जैनधर्म हा जनसामान्याचा धर्म राहिला असल्याकारणाने भगवंतांनी या आठ अंगाना फार महत्व दिले आहे. यातील एकही अंग जर नसेल तर सम्यक्दर्शन अपुरे राहील. आचार्य समंतभद्रांनी तर असे म्हटले आहे की ज्याप्रमाणे कमी कमी अक्षरांचा मंत्र कार्यसिध्दी करू शकत नाही, त्याप्रमाणे एखादे अंग कमी असेल तर सम्यग्दर्शनाची पूर्तता होणार नाही.

तीन मूढता :

विचारहीनता, अंधविश्वास आणि वस्तूस्वभावाचे नीट आकलन झाले नाही तर अनेक प्रकारच्या मूर्खपणाच्या गोष्टी माणूस आचरित असतो. त्यातीलच या मूढता होत.

१) लोकमूढता :

लोक करीत आहेत किंवा आमचे पूर्वज करीत होते म्हणून विवेक बाजूला सारून श्राध्द, तर्पण, संध्या, यज्ञोपवीत धारण करणे, पशुहिंसा, यज्ञ इ. गोष्टी करणे ही लोकमूढता होय. जागरूकपणे आणि प्रज्ञा-शक्तीचा उपयोग करण्याचे प्रतिपादन महावीरांनी केले. म्हणून अंधानुकरणाचा त्याग महत्त्वाचा आहे.

२) देवमूढता :

देवदेवतांच्या खोट्या कल्पना करून त्यांना बळी चढविणे, त्याच्याकडून लौकिक दृष्ट्या इष्टफळांची अपेक्षा करणे ही देवमूढता आहे. कोणतीही देवता मानवाचे हित-अहित करू शकत नाही. काही इष्ट-अनिष्ट करू शकत नाही. जे काही आपण सद्-असद्विचार करू त्याचीच फळे आपणास मिळतील. कारण ''परेण दत्तं यदि लभ्यते स्फुटं, स्वयं कृतं कर्म निरर्थकं तदा'' जर दुसरी एखादी शक्ती आमचे बरे-वाईट ठरवणारी असेल तर मग मानवाची किंवा जीव पदार्थाची स्वयंभूसत्ता ती कोणती ? जीवमात्राच्या स्वयंभू महासत्तेचा विसर जेणे करून पडणार नाही याची नित्य जागरूकता भगवंत आपल्या प्रत्येक प्रवचनांत देत राहिले. स्वयंभू सत्ता न मानली तर आपण केवळ खेळणे बनून जाऊ व स्वयंभूपणाचा लोप होईल. यासाठीच जैनधर्म ईश्वराची सत्ता स्वीकारत नाही. ईश्वर सत्ता स्वीकारली तर जीवाचे स्वयंभूपण नष्ट होते. म्हणून प्रत्येक जीवात्मा हाच कार्य-कारणरूपाने स्वयमेव परमेश्वर मानला आहे. जैनधर्माचा ईश्वराला विरोध नाही. फक्त ईश्वर एक मानून त्याचे प्रजाजनत्व स्वीकारण्याला विरोध आहे. ईश्वरासंबंधीचा विचार हा देखील तर्क, अनुमान आणि आगम यांच्या निकषावर घासून तपासून पाहिला पाहिजे. देवासबंधीच्या चुकीच्या कल्पना स्वीकारल्यामुळे सत्याचा अपलाप होतो. म्हणून देवदेवतासंबंधीची मूढता त्यागली पाहिजे.

३) पाखंडी मूढता :

सतत वैचारिक पाखंडे, व आचारात्मक पाखंडे निर्माण करीत राहणे आणि सामान्य जनतेला भोंदविणे हा पाखंडी लोकांचा धंदाच असतो. सामान्य जनता भयामुळे किंवा सुख-स्वप्नांच्या प्राप्तीच्या आशेने अनेक साधू-संताच्या मागे लागतात. गंडे, ताईत, भस्म, भविष्य ज्ञान, आरोग्य उपचार, पुत्रप्राप्ती, गुप्त संपत्तीचे ज्ञान इ. शेकडो लौकिक कारणासाठी ते त्या भोंदू साधूंच्या मागे लागतात. त्यांच्या मागे लागण्यात एका तऱ्हेची मानसिक दुर्बळता व वैचारिक अस्थिरता आहे. आध्यात्मिक दृष्टीने ते आत्म्याचे पतन होय. आत्मा जो काही शुभ-अशुभ विचार करील तशीच फळे त्याला मिळतील. विश्वातील दुसरी कोणतीही शक्ती त्याचे काही हिरावून घेऊ शकत नाही. देवाला काही मागणे, तो देतो असा समज बाळगणे, त्या देवाचे स्वार्थासाठी कोडकौतुक करणे हे सर्व समाजाला व व्यक्तीला आध्यात्मिक व मानसिक पतनाकडे घेऊन जातात. तीनही मूढतांचा त्याग आवश्यक आहे.

निर्भयत्व : आत्मदर्शनाची एक अट [१]

तत्वाचे सम्यक्स्वरूप स्वच्छ रीतीने जाणन घेण्याला निर्भयपणाची अट आहे. कारण जे जीवन कर्मबंधाचे स्वरूप, कर्माची फळे जाणत नाही ते भयभीत असते. आत्म्याला न जाणणारा भयग्रस्त असतो. तो आत्म-विचार गीतेत सांगितला आहे. उपनिषदात देखील आत्म्याच्या अमर स्वरूपाची वर्णने आलेली आहेत. जर आत्म्याचे ते खरे स्वरूप आहे तर भयाचा मागमूसही उरता कामा नये. पण जन्माच्या, कर्मबंधाच्या संस्कारामुळे खालील सात प्रकारचे भय निर्माण होते. १) लोकभय २) परलोकभय ३) मरणभय ४) वेदनाभय ५) आकस्मिक भय ६) अरक्षाभय ७) अ-गुप्तीभय.

---

१. मूलाचार - ५३; भावनाविवेक ४१-४३ ते ५१

ज्यावेळी श्रध्दा बलवान झालेली नसते व भगवंतांनी सांगितल्या मार्गातही चलमलादी दोष निर्माण होतात त्यावेळी मन भयभीत होते. पण सप्त तत्वावर जेव्हा दृढ श्रध्दान होते तेंव्हा उपरोक्त भय उरत नाहीत. मन नि:शंक बनते. मार्ग स्पष्ट दिसू लागतो.

मानस शास्त्रीय दृष्टीने भीति ही शारीरिक अपंगता, मानसिक कमकुवतपणा आणि आध्यात्मिक पतन यांची निदर्शक आहे. जीवनासंबंधी अंधारात भटकणाऱ्यांना 'भय' निर्माण होते. जीवन दु:खाने भरलेले वाटते. आत्महत्या करण्याचे विचार येतात. भयामुळे शरीरातील विविध ग्रंथीतील स्त्राव होतात व ते रक्तात अधिक प्रमाणात मिसळते जाऊन शरीराचा सम-तोल बिघडतो. सतत भीतीच्या दडपणाखाली वागल्याने शरीर व मन थकून जाते. म्हणून सत्याचा उघड स्वीकार करून व आत्म्याचे अमरत्वावर व ज्ञानघन स्वरूपावर दृढ विश्वास ठेवून जीवन उन्नत बनविणारा भगवंतांचा मोक्षमार्ग स्वीकारला पाहिजे.

निगर्वीपणा : मानस शुध्दीची अट

वर सांगितमलेले भय जसे बाळगू नये तसा गर्वही बाळगू नये. सम्यक् दर्शन झालेल्या माणसाच्या हृदयात विनय वास करीत असतो. अंहकार हा मिथ्यात्वाचा भाऊ आहे. सत्यजीवनाचा प्रत्यय, अनुभव त्यामुळे येत नाही. म्हणून आत्मविकासोन्मुख माणसासाठी निगर्विता ही देखील असामान्य अट आहे. समंतभद्र आचार्यांनी - १) ज्ञान २) पूजा ३) कुल ४) जाती ५) बल ६) वृध्दी ७) तप व ८) शरीर अशा प्रकारचा गर्व रत्नकरंडात नमूद केलेला आहे. ज्ञान आत्म्याचा एकमेव सर्वव्यापी गुण आहे. त्याचा अहंकार करण्याचे कारण नाही. इतर सात अहंकार शरीराश्रित असल्याने त्याचा स्पष्ट निषेध करणे आवश्यक आहे. संपत्ती-विपत्ती, सुख-दु:ख, ऐश्वर्य-दारिद्र्य यांचा आत्म्याशी कवडीचाही संबंध नाही. अशा परद्रव्याच्या निमित्ताने आत्म्याला मोठा मानणे ही गोष्ट सर्वथैव तर्कविरोधी आहे. म्हणून आठही प्रकारच्या गर्वांचा अभाव हाच जीवाचा स्वभाव होय.

सम्यक्दर्शनी जीवाची ओळख [१/२]

सम्यक्दर्शन झाल्याची बाह्य ओळख खालील चार गोष्टींनी होते - १) प्रशम २) संवेग ३) आस्तिक्य ४) अनुकांपा.

१) प्रशम : क्रोधादी विकारांचा उपशम किंवा मंदता.

२) संवेग : संसार परिवर्धनात्मक किंवा आश्रव-बंधकारक गोष्टींचा प्रयत्नपूर्वक त्याग.

३) आस्तिक्य : जीवादी सप्त तत्वावर दृढ श्रध्दा.

४) अनुकम्पा : एकेंद्रिय जीवापासून तो पंचेद्रिय जीवापर्यंत साऱ्या जीवासाठी करूणाबुध्दी बाळगणे. त्याची चुकून ही हिंसा घडू नये, त्यांना आपल्याकडून पीडा होऊ नये, म्हणून जी मानसिक प्रवृत्ती होते ती अनुकम्पा होय. सत्य मार्गापासून जे दूर आहेत यांच्या बद्दलही अपार सहानुभूती हृदयी असावी लागते.

याशिवाय जो भगवंताच्या मार्गाने जात आहे त्यांच्या दौर्बल्यामुळे त्याच्याकडून प्रमाद घडण्याची शक्यता आहे. त्या प्रमादासाठी त्याने जागरूकपणे १) त्या प्रमादाची निंदा केली पाहिजे. म्हणजे चुकांच्या समर्थनापासून दूर राहिले पाहिजे. २) तसेच स्वत:च्या अज्ञानामुळे व चारित्र मोहामुळे कशा चुका घडतात याबद्दल स्वत:लाही दोष देण्याला गर्हा असे म्हटले आहे. आणि तिसरी प्रक्रिया आहे भक्तीची. भक्तीसाठी साधकाने आप्त म्हणजे वीतराग प्रभूला पहिले स्थान द्यावे. त्या वीतराग देवाची स्तुती, भजन, कीर्तन, पूजन आणि ध्यान करावे. त्यामुळे साधकाला आपल्या साध्य वस्तूचे सदैव स्मरण राहते. भक्ती म्हणजे साध्य वस्तूच्या प्राप्तीसाठी केलेला पुरुषार्थ होय. जैन साधकाला भौतिक

---

१. रत्नकरंड - २५

२. राजवार्तिक २-३०; यशस्तिलक पान २५५.

जीवनाचे आकर्षण नसते. त्याचा मार्ग आत्मदर्शनाचा असतो. म्हणून ऐहिक वस्तूंच्या लाभासाठी केलेली भक्ती जैन-मार्गात निषिध्द आहे. दुसरी भक्ती श्रावकाने भगवंतांच्या प्रवचनावर म्हणजे आगमावर करावी. शास्त्रांचे वाचन, मनन, चिंतन, पठन आणि पाठन यांच्याद्वारे सत् शास्त्रांची भक्ती करावी. उत्तम शास्त्रांच्या वाचनाने भगवंताचा मार्ग अधिक प्रकाशित होतो. तिसरी भक्ती जिनमार्गात जे प्रविष्ट झालेले आहेत अशा श्रेष्ट साधूंची करण्यास सांगितले. साधू हे जैनधर्माचे म्हणजेच आत्मधर्माचे खरे उपासक होत. त्या थोर तपस्वींची सेवा करणे, उपासना करणे, त्यांना आहार-विहारांची सोय करू न देणे, त्यांच्या औषधोपचाराची व्यवस्था करणे ही गुरू भक्ती होय.

अशा रीतीने मोक्षमार्गातील पहिला पुरुषार्थ म्हणजे सम्यकदर्शनाची प्राप्ती होय. त्यामुळे प्राप्त होणाऱ्या भौतिक सुखसंपत्ती व वैभव यांची येथे नोंद न करता, हे सांगितले म्हणजे पूरे की

सम्यक्दर्शन प्राप्त झालेला जीव नरकात जात नाही, स्त्री होत नाही, नपुंसक होत नाही, दरिद्री होत नाही. इतकेच नव्हे तर अनेक स्वर्गीय सुखाचा उपभोग घेऊन, तेथून मनुष्य जन्मात येऊन चक्रवर्तीत्व व तीर्थंकरत्व प्राप्त करू न घेऊन सिध्द होतो. हा सर्व महिमा सम्यकदर्शनाचा आहे. कारण तो आत्म्याचाच गुण होय. त्या गुणांचा उद्‌भव आतून बाहेर झाला पाहिजे. कारण सम्यक्दर्शनाशिवाय होणाऱ्या ज्ञानाचे प्रामाण्य सिध्द होत नाही. म्हणून सम्यक्दर्शनाची मंगलप्रभात झाली पाहिजे.

सम्यक्ज्ञान :

रत्नत्रयातील दुसरे रत्न हे सम्यक्ज्ञान होय. सम्यग्दर्शनाचा प्रखर प्रकाश सर्वत्र पसरला तर वस्तूचे स्पष्ट दर्शन होऊ शकते. ज्ञान हा तर आत्म्याचा प्रमुख गुण. आत्मा आणि ज्ञान असा भेद करू न पाहण्यानेही कदाचित दोष निर्माण होईल. म्हणून आत्मा हा रत्नत्रयच होय. आणि रत्नत्रय हे तीन न समजता एकाकार आत्मरूपच जाणले पाहिजे.[१]

---

१. सम्यग्दर्शनमेतदेव नियमादात्मा-अमृतचन्द्र. समयसार टीका-६.

दर्शन आणि ज्ञान :

दर्शन म्हणजे चैतन्याची अशी अवस्था की जी निराकार रूप राहते. आणि ज्ञान म्हणजे त्या चैतन्याची साकार अवस्था होय.

ततः सामान्य विशेषात्मक बाह्यार्थ ग्रहणं ज्ञानं ।

तदात्मक स्वरू पग्रहणं दर्शनमिती गिध्दम् .... ।। धवलाटीका - पृ. १४९ (प्र. भाग)

यावरून दर्शन आणि ज्ञान यातील भेद आपणास स्पष्टपणे कळेल. एखादी वस्तू सामान्य रूपाने जाणणे हे दर्शन व तिच्या वस्तूपणाची खात्री म्हणजे ज्ञान. पण सामान्यरूपाने जाणण्यात संशय नसला पाहिजे. संयश, विमोह किंवा विभ्रम ह्या ज्ञानाच्या मिथ्या अवस्था होत.

आगमात वर्णन केलेल्या सम्यक्ज्ञानाचे वर्णन आणि न्यायशास्त्रदृष्ट्या स्वामीं अकलंक, समंतभद्र, माणिक्यनंदी आदि महान् तार्किकांनी ज्ञानाचे केलेले वर्णन यात दृष्टीचा व अपेक्षेचा भेद आहे. असे म्हटले जाते की सम्यग्दर्शनपूर्वक झालेले ज्ञानच सम्यक् होय. मिथ्यात्वातील

ज्ञान मिथ्याज्ञान होय. सूत्रकार श्री. उमास्वामींनी ‘‘ मतिश्रुतावधयो विपर्ययश्च ’’ (सूत्र. १।३१।) या सूत्राने हे स्पष्ट केले आहे की जो मिथ्यात्वी आहे त्याचे मतिज्ञान, श्रुतज्ञान व अवधिज्ञान ‘कु’ असते, मिथ्या असते.

परंतु दार्शनिक दृष्टीने ज्ञानाचा व ज्ञानप्रामाण्याचा विचार वेगळा करावा लागतो. केवळ मोक्षोपयोगिता किंवा संसार विनाशकता पाहून ज्ञानाचे प्रामाण्य ठरवून चालत नाही. म्हणून सिध्दिविनिश्चय (१। १०) या ग्रंथात असे म्हणले आहे की, अविसंवादी ज्ञान सत्य व प्रमाणभूत होय.

आगमिक ज्ञानाची रचना :

आत्मा आणि ज्ञान या दोन वस्तू नाहीत. चिद्घन-स्वरूप आत्मा हा केवळ ज्ञान स्वरूपच होय. सूर्य जसा अनंत उष्णता उर्जांनी युक्त आहे असा आत्मादेखील ज्ञानानेच भरलेला आहे. त्या ज्ञानाचे १) मतिज्ञान २) श्रुतज्ञान ३) अवधिज्ञान ४) मन:पर्ययज्ञान ५) केवलज्ञान असे मुख्यत: पाच प्रकार करून कु-मति, कु-श्रुति व कु-अवधिज्ञान असे तीन प्रकार मिळून एकूण ज्ञानाचे आठ विकल्प मांडले आहेत. ज्ञान सर्वांशाने व एक चिद्घन स्वरूपाचे जरी असले तरी ज्ञानावरणीय कर्माच्या अपेक्षेने -म्हणजे क्षयोपशमाच्यादृष्टीने ज्ञानाचे विकल्प मांडले गेले आहेत. एखाद्या सुंदर मूर्तीवर एखादे अगदी तलम वस्त्र जरी घातले तरी सौंदर्य - बोधाला अडथळा येतोच. तसे शुध्द ज्ञानमय आत्म्याला ज्ञानावरणीय कर्म झाकून टाकते व त्यामुळे ज्ञान-प्रक्रियेला वेगवेगळ्या तऱ्हेने विविध अडथळे येतात.

प्रत्यक्ष आणि परोक्ष ज्ञान :

प्रत्यक्षज्ञान म्हणजे इंद्रिये व मन यांच्या मदतीशिवाय जे ज्ञान होते ते प्रत्यक्षज्ञान होय. प्रत्यक्षज्ञान आत्म्याच्या सहाय्याने होते. या प्रत्यक्ष ज्ञानात १) अवधिज्ञान २) मन:पर्ययज्ञान व ३) केवलज्ञान ही तीन ज्ञाने मोडतात. तसेच मतिज्ञान व श्रुतिज्ञान ही दोन ज्ञाने इंद्रिये व मन यांच्या

सहाय्याने होतात, म्हणून त्यांना परोक्ष म्हटले आहे. परंतु भारतीय तत्वज्ञानाच्या विवेचनाच्या संदर्भात पुन: विचार करणाऱ्या जैन तत्वज्ञान्यांनी मति व श्रुत या ज्ञानाला प्रत्यक्ष म्हटले आहे. जिनभद्रांनी त्यांना सांव्यवहारिक प्रत्यक्ष म्हटले आहे. म्हणून जेव्हा मति व श्रुत यांना प्रत्यक्ष म्हटले तेव्हा त्यांना इंद्रिय प्रत्यक्ष जाणावे आणि इतर तीन ज्ञाने अनिंद्रिय प्रत्यक्ष जाणावीत. (नंदीसूत्र- ४)

मतिज्ञान :

पाच इंद्रिये व मन यांच्या सहाय्याने वस्तूंचे जे ज्ञान होते ते मतिज्ञान होय. मन जरी इंद्रिय नसले तरी नो-इंद्रिय म्हणून त्याचा समावेश उमास्वामींनी केला आहे. सिध्दसेनगणींनी मतिज्ञान तीन प्रकारे होते म्हणून सांगितले - (१) इंद्रियांनी होणारे (२) मनाच्या सहाय्याने होणारे व (३) इंद्रिय व मन यांच्या सहाय्याने होणारे. या तीन प्रकारांचा हेतू हा की, या संसारात एक पेशी जीवही आहेत. केवळ स्पर्शेंद्रियच त्यांना असते. त्यांना मन नसते. म्हणून अशा जीवांना होणाऱ्या ज्ञानाला देखील मतिज्ञान म्हणतात.

मानवाने जेव्हापासून ''ज्ञान कसे होते ?'' ''माणूस जाणतो कसा ?'' याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हापासून ते प्रश्न अद्यापपर्यंत अनुत्तरित आहेत. जैन तत्वज्ञानी पुरू षांनी भगवान महावीरांच्या प्रवचनांचा मागोवा घेत असे म्हटले आहे की, आत्मा - ज्ञानमय आहे. जसा दिवा प्रकाशमय. तो त्याचा गुण आहे. इंद्रिय आणि पदार्थ यांच्या सन्निकर्षाने ज्ञान होते हे खरे. परंतु इंद्रिये नसली तर ज्ञान होणारच नाही, हे मात्र खरे नाही. म्हणून महावीरांनी ज्ञानगुणाला अडथळा आणणाऱ्या ज्ञानावरणीय कर्माचे निरूपण केले आणि त्यादृष्टीने मतिज्ञानावरण, श्रुतज्ञानावरण, अवधिज्ञानावरण, मन:पर्यय ज्ञानावरण व केवलज्ञानावरण अशी ठोकळमानाने पांच आवरणे सांगितली आहेत. म्हणून इंद्रियांनी ज्ञान होते, हे वाक्यही अर्धसत्याला धरून आहे. इंद्रियांच्या मागे अशी कोणती तरी शक्ती आहे की ज्यामुळे इंद्रिये जाणण्यास समर्थ होतात. आजला मेंदूच्या विविध भागांचे ज्ञान होऊन ते सिध्द झाले आहे की, इंद्रिये ही वस्तूला जाणत नसून मेंदूतील विशिष्ट भाग जाणण्याचे कार्य करतो. तो विशिष्ट भागही दोन प्रकारे सांगण्यात

येतो. एक ज्या पेशींनी तो मेंदू बनला असा आणि दुसरा, त्या भागाची नियंत्रक अशी भावनात्मक शक्ती .

जैन आचार्यांनी देखील द्रव्येंद्रिय आणि भवेंद्रिय असे दोन विकल्प करून ज्ञान कसे होते हा प्रश्न सोडविला आहे. प्रत्यक्ष इंद्रिये ही साधनभूत होत. त्या इंद्रियाच्यामार्फत संवेदना स्वीकारून त्या संवेदनांचे पृथ:करण करून त्या संबंधीची अंतिम निर्णय भावेंद्रिच देते. हे भावेंद्रिय म्हणजे मति ज्ञानावरण स्वरूपाचा आत्माच होय. [१/२/३]

---

(१) स्थानांग - भाग २, १-७; तत्वार्थ - १-१२.

(२) इंदियमणोभवं जं तं संववहारपच्चक्खं - विशेषावश्यक- ९५, तत्र सांव्यवहारिकं इंद्रियानिंद्रिय प्रत्यक्षम्, लघी, स्ववृ. श्लोक-४.

(३) ज्ञान हा तत्वज्ञानांचा विषय नसून विज्ञानाचा विषय आहे - बर्ट्रॅंड रसेल. जर्नल ऑफ

मतिज्ञानाचे भेद : [१]

अवग्रह, ईहा, अवाय आणि धारणा असे चार सांव्यवहारिक प्रत्यक्षाचे भेद आहेत. इंद्रिय आणि पदार्थ यांचा संबंध आल्यावर केवळ ‘अस्ति’ मात्र ज्ञानाला अवग्रह म्हणतात. या अवग्रहाचे व्यंजनावग्रह व अर्थावग्रह असेही सूक्ष्मभेद केलेले आहेत. व्यंजनावग्रहाने पदार्थाने अव्यक्त ज्ञान होते. डोळ्यांना व्यंजनावग्रह होत नाही. कारण डोळे हे पदार्थाला स्प्टपणे जाणतात. अवग्रहाने जाणलेल्या पदार्थासंबंधी निश्चयात्मक ज्ञानाकडे झुकणाऱ्या ज्ञानाला ईहा म्हणतात. निर्णयात्मक इ ाानाला ‘अवाय’ म्हणतात. कारण ‘अवाय’ ज्ञानात अनिष्ट अंशाची निवृत्ती होते. ज्ञान होताना ‘जे आहे’ त्याची निश्चिती व ‘जे नाही’ त्याची निवृत्ती होत असते. जैनधर्माचे हे विश्लेषण आजच्या मानस शास्त्रज्ञांनी व शरीर शास्त्रवेत्यांनीही मान्य केले आहे. जसे एखादी वस्तु टेबल आहे असे म्हटल्यानंतर इतर सर्व पदार्थांचा अभावही अंतर्भूत होतो. अवाय झाल्यानंतर कालांतराने देखील अवायने जाणलेल्या पदार्थांचे स्मरण होणे, याला धारणा म्हणतात. सायकल शिकलेला माणूस १५-२० वर्षांनी जरी सायकल चालवील तरी त्याला ती चालविता येईल. याचे

कारण मतिज्ञान होय. हे मतिज्ञान जन्म-जन्मांतरीही उपयोगात येते. जसे, मूल जन्मतःच दूध पिऊ लागते व एखादे वासरू स्वयमेव उभे राहू शकते.

अवग्रहादि ज्ञानाचे एक-एकविध, बहु-बहुविध, क्षिप्र-अक्षिप्र, निःसृतअनिसृित, उक्त-अनुक्त, धृव-अधृव असे बारा सूक्ष्म प्रकार सांगितले आहेत. मतिज्ञानाचे इतके सूक्ष्म विवरण आजच्याही विज्ञानवाद्यांना आश्चर्यात टाकते. डोळ्यांचा विषय रंग असला तरी डोळे केवळ रंगच पाहात नाही तर वस्तूही पाहतात. याचा अर्थ डोळे गुण आणि द्रव्यही पाहातात.

स्मृति, प्रत्यभिज्ञान, तर्क, अनुमान असे मतिज्ञानाचे दुसरे चार भेद आहेत. इंद्रियांच्या व मनाच्या सहाय्याने जे ज्ञान होते ते केवळ त्या क्षणापुरते राहात नाही. मरेपर्यंतही या ज्ञानाची स्मृति राहते. कधी कधी गेल्या जन्माची आठवणही मतिज्ञानामुळे होते. स्मृति, स्मरण हा बुध्दीचा चमत्कार मानला जातो. परंतु एकाच क्षणात वस्तुच्या अनंत अवस्थांना पाहण्याचे स्वातंत्र्य आत्म्यातील ज्ञान शक्तीत आहे. मतिज्ञान हे जड इंद्रिये व मन यांच्या सहाय्याने होत असल्याने मति, श्रुति यांनाही अध्यात्ममार्गात जड ज्ञान म्हटले आहे. वस्तू स्वरूपाची निश्चिती करतांना न्यायशास्त्रात तर्क आणि अनुमान यांना प्रमाण मानण्यात येते. कारण तर्क आणि अनुमान यांच्याद्वारे सत्याप्रत पोचण्याचाही मार्ग शास्त्रशुध्द आहे. आजच्या विज्ञानात सर्व श्रेष्ठ गणला गेलेला महान शास्त्रज्ञ आईनस्टाईन याने आपल्या सापेक्षतावाद या पुस्तकात अणूसंबंधी किंवा एकूण पदार्थसंबंधी जी विधाने केलेली आहेत ती सर्व तर्क आणि अनुमान यांच्या आश्रयानेच होय. जैन महर्षींनी सुध्दा जैनधर्माचा जो आसेतुहिमाचल प्रचार व प्रसार केला त्यात त्यांनी वरील पध्दतीच वापरली. मतिज्ञान हे दुसऱ्याच्या उपदेशाने जेव्हा होते, तेव्हा ते श्रुतज्ञान होय. (गोम्मटसार - ३२०) मतिज्ञानाचे ५ इंद्रिये व मन अशा सहाचे अवग्रहादिक चार प्रकाराने २४ भेद होतात. त्यात नेत्राचा व्यंजनावग्रह होत नाही म्हणून उरलेल्या चार इंद्रियांचा चार प्रकारचा व्यंजनावग्रह धरून एकूण २८ भेद होतात. या भेदांना मागे सांगितलेल्या बहु-बहुविध अशा १२ प्रकारांनी गुणल्यास मतिज्ञानाचे ३३६ भेद मानण्यात आले आहेत. (गोम्मटसार - ३०९, ३१०) यासंबंधी विस्तृत वर्णन अन्य ग्रंथातून वाचावे.

श्रुतज्ञान : [१]

मतिज्ञानचे विषयभूत पदार्थ सोडून इतर पदार्थांचे जे ज्ञान ते श्रुतज्ञान

(१) साधनात् साध्य विज्ञानम् - न्यायवि. १६७. परिक्षामुखं - ३।२०-२५

(२) जे केवळ कैवल्यानेच जाणता येतील असे पदार्थ अनंतानंत आहेत (गो.जी. ३३३)

(३) गो. जी. गाथा ३६८.

(४) यांचे विस्तृत वर्णन गोम्मटसार जीवकांडामध्ये ज्ञानमार्गणेत पहावे.

होय. श्रुतज्ञान हे मतिज्ञानपूर्वकच होते. (गो. जी. ३१४). श्रुतज्ञान हे अक्षरात्मक व अनक्षरात्मक अशा दोन प्रकारचे आहे. गोम्मटसारात आचार्य नेमिचंद्र शब्दजन्य श्रुतज्ञान व लिंगजन्य (चिन्ह) श्रुत ज्ञान असे दोन भेद करतात. श्रुतज्ञानाचा विषय अखिल ब्रम्हांड होय. संपूर्ण विश्वाला अक्षरात्मक (शास्त्रआगम इ. मार्गानी) रीतीने जाणणारा श्रुतकेवली होऊ शकतो.

श्रुतज्ञानाचे पर्याय, अक्षर, पद, संघात, प्रतिपत्ती, अनुयोग, प्राभृत, वस्तु, पूर्व इ. वीस भेद केलेले आहेत. सूक्ष्मात सूक्ष्म पर्याय - श्रुतज्ञान हे निगोदिया जीवांना असावेच लागते. पर्याय-श्रुतज्ञान हे निरावरण असते. अर्थात विशुध्दतम असते. ज्ञानावरणीय कर्मांनी ज्ञान कितीही झाकून टाकले तरी संपूर्णत: ज्ञानगुण झाकला जात नाही. पर्यायज्ञान हे नित्य निरावरण असते. (गो.जी. ३१९) या निरावरण ज्ञानाची ठिणगीच जीवाला कैवल्याच्या बोधाप्रत नेते.